MERC

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

१३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६
ई-मेल: mercindia@merc.gov.in संकेतस्थळ: www.mercindia.org.in / www.merc.gov.in

जाहिरात क्र. १३/२०१६-१७

## जाहीर सूचना

**सन २०१७ चे प्रकरण क्र. ३३**

**आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानाकरिता सामान्य (जेनेरिक) वीज दराच्या प्रारुप आदेशावर अभिप्राय मागविण्याबाबत**

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा (मविनिआ) आर्थिक वर्ष २०१७-१८ करिता (२०१७ चे प्रकरण क्र. ३३) महाराष्ट्रातील नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानाकरिता सामान्य (जेनेरिक) वीज दराचा प्रारुप आदेश आयोगाच्या **www.mercindia.org.in/www.merc.gov.in** या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

२. या प्रारुप आदेशावर, आयोग लेखी अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती मागवित असून, त्या ६(१+५) प्रतींमध्ये, आयोगाचे सचिव यांना, मविनिआ, १३ वा मजला, केंद्र क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४००००५, येथे व्यक्तिश: किंवा पोस्टाने, किंवा फॅक्स किंवा ई-मेल (फॅक्स:०२२-२२१६३९७६, ई-मेल: **mercindia@merc.gov.in**) द्वारा **दि. २२ मार्च, २०१७** पर्यंत कृपया पाठविण्यात याव्यात.

३. या अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकतींवर पाठविणाऱ्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि ई-मेलचा पत्ता, असल्यास देण्यात यावा. जर कोणत्याही संस्था किंवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने या अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती पाठविण्यात येत असतील तर तसे नमूद करण्यात यावे. पाठविणाऱ्या व्यक्तीला आपले म्हणणे व्यक्तीश: मांडावयाचे असेल तर तसे देखील त्यामध्ये नमूद करावे, म्हणजे अशा प्रकरणी सदर व्यक्तीला, **सेंट्रम हॉल, पहिला मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४०० ००५ येथे, बुधवार, दिनांक २२ मार्च, २०१७ रोजी, सकाळी ११.०० वाजता** होणाऱ्या जाहीर सुनावणीमध्ये, त्याचे म्हणणे मांडण्याची संधी आयोगाकडून देण्यात येईल, त्यासाठी वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

४. दिनांक **२२ मार्च, २०१७** रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त होणारे सर्व अभिप्राय, सूचना आणि हरकती आयोगाकडून आदेशास अंतिम स्वरुप देण्यापूर्वी विचारात घेण्यात येतील.

**दिनांक: २३ फेब्रुवारी, २०१७**
**ठिकाण: मुंबई**

सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग